# प्रकरण ५ वे - रेंदाळमधील विकासकामांचे विश्लेषण

५.१ प्रस्तावना

५.२ विकासकामांची विभागणी

५.३ विकासकामांचे विश्लेषण

५.४ विकासकामांची टक्केवारी

५.५ समारोप

संदर्भसूची



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

# प्रकरण ५ वे
# रेंदाळमधील विकासकामांचे विश्लेषण

## ५.१ प्रस्तावना :

"रेंदाळने जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावात विकासाचे विविध उपक्रम राबविले. त्यातून गावाचा विकास घडवून आणला. रेंदाळने विकासासाठी नेमके काय केले? सर्व लोकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेतले का? विकासाचे लाभ सर्वांपर्यंत पोहचले का? याचा अभ्यास करण्यासाठी ८० लोकांकडून प्रश्नावलीद्वारे माहिती भरुन घेण्यात आली. चौथ्या प्रकरणामध्ये रेंदाळने राबविलेल्या उपक्रमांचे व प्रश्नावलीचे वर्गीकरण करण्यात आले आहे. निष्कर्षाप्रत जाणे सोपे व्हावे यासाठी या वर्गीकरणाचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. चौथ्या प्रकरणातील प्रश्नावलीच्या वर्गीकरणाच्या आधारे प्रस्तुत प्रकरणात रेंदाळमधील विकासकामांचे विश्लेषण करण्यात आले आहे."१

## ५.२ विकासकामांची विभागणी :

रेंदाळने राबविलेल्या विविध उपक्रमांचे विश्लेषण करणे सोपे जावे यासाठी या उपक्रमांची तीन विभागात विभागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये लोकसहभाग, विकास व नहिला सक्षमीकरण या तीन प्रमुख घटकांचा समावेश आहे. या तीन घटकांवर आधारीत प्रश्न ग्रामस्थांना विचारण्यात आले. त्यांनी दिलेल्या प्रश्नांचे बाबवार वर्गीकरण चौथ्या प्रकरणात केले आहे. त्या वर्गीकरणाचा आधार घेऊन प्रत्येक प्रश्नाचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात आले आहे.

## ५.३ विकासकामांचे विश्लेषण :

लोकसहभाग, विकास आाणि महिला सक्षमीरकण या प्रमुख तीन विभागातील २८ प्रश्नांचे विश्लेषण चौथ्या प्रकरणातील वर्गीकरणावरुन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

## अ) लोकसहभागाविषयी विचारलेल्या प्रश्नांचे विश्लेषण :

१) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - १) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ८० पैकी ७५ लोकांना जलस्वराज्य प्रकल्प हा पाण्यासाठी आहे हे माहित आहे. ३१ लोकांनी जलस्वराज्य प्रकल्प हा पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरण यासाठी आहे असे सांगितले आहे. याचा अर्थ ३८.७५ % लोकांना जलस्वराज्य प्रकल्पाची सर्व ध्येयधोरणे समजली आहेत. तर ९३.७५ % लोकांना जलस्वराज्य प्रकल्प हा मुख्यत्वे पाण्यासाठी असल्याचे समजले आहे. प्रकल्प नेमका कशासाठी आहे हे माहित नसणाऱ्या लोकांचे प्रमाण ६.२५% इतके कमी आहे. याचाच अर्थ जास्तीत जास्त लोकांपर्यंत जलस्वराज्य प्रकल्प पोहचला आहे.

२) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - २) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्प गावात कधी सुरु झाला या प्रश्नाचे उत्तर वेगवेगळे दिले असले तरी ७८.७५% लोकांना निश्चित महिना व वर्षे माहित आहे. २१.२५% लोकांनी निश्चित सांगता-येणार नाही असे सांगितले असले तरी अंदाजे दोन ते अडीच वर्षापूर्वी असे उत्तर दिलेले आहे.

३) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ३) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ग्रामसभा व महिला ग्रामसभेसाठी उपस्थित राहणाऱ्या लोकांची संख्या ८५% इतकी आहे. साधारणत: शासनाच्या नियमानुसार ४०% कोरम असल्याशिवाय ग्रामसभा घेता येत नाही. कोणत्याही ठरावाला मान्यता देता येत नाही. रेंदाळमध्ये ८० पैकी ६८ उत्तरदात्यांनी ग्रामसभेला उपस्थित राहत असल्याचे सांगितले आहे. याचाच अर्थ लोकांना आपल्या अधिकारांची व कर्तव्याची जाणीव आहे. तसेच या आकडेवारीवरुन लोकसहभाग चांगला असल्याचे लक्षात येते.

४) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ४) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत कवठेपिराण, स्वयंसिद्धा, मयूर दूध संघ या तीन ठिकाणी अभ्यासदौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. ८० पैकी ६० ग्रामस्थांनी तीन ठिकाणापैकी एका तरी ठिकाणाला भेट दिलेली आहे. अभ्याससहलीचा मुख्य उद्देश आदर्श गावाला, मोठ्या उद्योग समुहाला भेट देवून त्याप्रमाणे आपल्या गावात विकासाची प्रक्रिया राबविणे हा होता. ७५% लोकांना या संधीचा लाभ घेता आला. याचाच अर्थ विकासाच्या उपक्रमात जास्तीत जास्त लोक सहभागी झाले आहेत.

५)चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ५) मधील स्पष्टीकरणावरुन असे दिसून येते की, लोकवर्गणी भरली असल्याचे उत्तर ७५ लोकांनी दिलेले आहे. रक्कम भरण्याचे प्रमाण २५० पासून ५००० रुपयांपर्यंत आहे. लोकवर्गणी भरणाऱ्या लोकांचे प्रमाण ९३.७५% इतके आहे. ६.२५% लोकांनी लोकवर्गणी भरलेली नाही. परंतु काही लोकांनी ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा जास्त वर्गणी भरुन ती कमतरता भरुन काढली आहे. लोकवर्गणी भरणाऱ्या लोकांच्या प्रमाणावरुन लोकसहभाग व विकासकामातील सहभाग दिसून येतो.

६)चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ६) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्प गावात सुरु झाल्यानंतर तो जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचावा, त्याची ध्येयधारणे, उद्दीष्ट्ये लोकांना समजावीत व त्यातून लोकांचा सहभाग वाढावा यासाठी क्षमता बांधणी प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणांचा लाभ ७५% लोकांनी घेतला. याचा अर्थ जलस्वराज्य प्रकल्प सुरवातीला प्रशिक्षणांच्या माध्यमातून जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्यात अधिकारी व पदाधिकारी यांना यश आले आहे. प्रशिक्षणांच्या माध्यमातून लोकसहभाग वाढविण्याचे शासनाचे धोरण यशस्वी ठरले आहे.

७)चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ७) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, लोकसहभाग, विकास व महिला सक्षमीकरणासाठी उपप्रकल्प १ अंतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले होते. ४६.२५% लोकांनी या प्रशिक्षणाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यशाळा व प्रशिक्षणांमुळे लोकांना जलस्वराज्य प्रकल्पाची ध्येयधोरणे समजणे सोपे झाले.

८)चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ८) मधील स्पष्टीकरणावरुन असे दिसून येते की, महिला सक्षमीकरणासाठी व महिलांना प्रकल्पाच्या कामात सहभागी करुन घेण्यासाठी फक्त महिलांसाठी उपप्रकल्प ३ अर्थात महिला सक्षमीकरणांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण ८ प्रकारच्या प्रशिक्षणांचा समावेश होता. त्याचा लाभ घेतल्याचे ३४ महिलांनी सांगितले आहे. महिला सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणांचा लाभ ८५% महिलांनी घेतला आहे. महिलांना सक्षम बनविण्याचा संदेश त्यांच्यापर्यंत प्रशिक्षणाच्या माध्यमातून पोहचविण्यात रेंदाळमध्ये यश आले आहे.

९) चौथ्या प्रकरणातील सारणी क्र. (अ - ९) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, पाणीपुरवठा योजनेसाठी लागणारे साहित्य उदा. पाईप, सळी, सिमेंट खरेदी करण्यासाठी ८० पैकी ३६ ग्रामस्थ गेले होते. मालाच्या गुणवत्तेला प्राधान्य दिले जावे, कारभारात पारदर्शकता राहावी यासाठी साहित्याची खरेदी करताना फक्त समिती सदस्यांनी जाऊ नये, ग्रामस्थांनाही खरेदी प्रक्रियेत सहभागी करुन घ्यावे असा जलस्वराज्य प्रकल्पाचा नियम आहे. रेंदाळमध्ये ८० पैकी ३६ ग्रामस्थांनी याचाच अर्थ ४५% उत्तरदात्यांनी पाणीपुरवठ्याच्या खरेदीसाठी गेलो असल्याचे सांगितले. त्यामध्ये १४ महिलांचा समावेश होता. यावरुन विकास प्रक्रियेत पदाधिकाऱ्यांनी ग्रामस्थांना सहभागी करुन घेतले असल्याचे लक्षात येते. या प्रक्रियेमुळे महिलांच्या सक्षमीकरणास वाव मिळाल्याचे दिसून येते.

१०) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (अ - ९) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ८० पैकी ५९ लोकांना जलस्वराज्य प्रकल्प म्हणजे काय हे समजले आहे. ७३.७५% लोकांना जलस्वराज्य प्रकल्पाची संकल्पना लक्षात आली आहे. हा प्रकल्प पाणी, स्वच्छता व महिला सक्षमीकरणासाठी आहे. लोकसहभागातून तो यशस्वी करायचा आहे हे लोकांना माहित आहे.

## ब) विकासकांविषयीच्या प्रश्नांचे विश्लेषण :

१) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - १) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, रेंदाळमध्ये जलस्वराज्य प्रकल्प सुरु होण्यापूर्वी प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना होती. या योजनेचे पाणी पंचगंगा नदीवरुन आणले होते. हेच पाणी पिण्यासाठी वापरत असल्याचे ५६ लोकांनी सांगितले. १६ लोक एम.आय.डी.सी. येथील पाणी वापरत होते. ८ लोक विहिर किंवा बोअरवेलच्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करत होते. या विविध स्त्रोतांद्वारे मिळणारे पाणी पुरेसे व शुद्ध स्वरुपात नव्हते असे उत्तर ८० लोकांनी दिले आहे. म्हणजेच १००% लोकांना मिळणारे पाणी प्रदूषित असल्यामुळे पूर्वीचे स्त्रोत पिण्याच्या पाण्यासाठी अयोग्य वाटत होते. यावरुन रेंदाळसाठी पिण्याच्या पाण्यासाठी दुसरी योजना किंवा शुद्ध पाणीपुरवठा करणारा स्त्रोत आवश्यक असल्याचे दिसून येते.

२) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - २) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्प सुरु होण्यापूर्वी ३१.२५% लोकांकडे पिण्याच्या पाण्यासाठी वैयक्तिक नळ कनेक्शन होते. उर्वरित

लोकांना पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत होता. त्यासाठी लोकांचा बराच वेळ खर्च होत होता. जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत ८० पैकी ५० लोकांना वैयक्तिक नळ कनेक्शन देण्यात आलेली आहेत. ६२.५% लोकांना प्रकल्प सुरु झालेनंतर कनेक्शन मिळाली आहेत. आज रोजी ९३.७५% लोकांकडे पिण्याच्या पाण्याची घरच्या घरी सोय झाली आहे. यावरुन असे लक्षात येते की, महिलांचा किंवा घरातील लोकांचा पिण्याचे पाणी मिळविण्यासाठी वाया जाणारा वेळ वाचला आहे. तो वेळ ते विकासाच्या कामासाठी वापरत आहेत.

३) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ३) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पातून सुरु झालेल्या नळपाणीपुरवठा योजनेतून पुरेसे, शुद्ध व स्वच्छ पाणी मिळते असे ८० पैकी ७८ लोकांचे उत्तर आहे. ९७.५% लोकांनी प्रकल्पामुळे आमची पाण्याची गरज भागली असल्याचे सांगितले आहे. पूर्वी दहा ते बारा दिवसातून एकदा पाणी येत होते. प्रकल्पांतर्गत सध्या गावात दररोज नियमितपणे पाणीपुरवठा सुरु आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर झाली आहे. वेळेची बचत झाली आहे. मुख्यत: महिलांना पाण्यासाठी जास्तीचा वेळ द्यावा लागत नसल्यामुळे शिल्लक वेळ त्या आपल्या विकासासाठी वापरत आहेत. गावातील प्रत्येक घरापर्यत पाणी पोहचविण्याचे प्रकल्पाचे उद्दीष्ट आहे. त्यादृष्टीने रेंदाळमध्ये योजनेचे काम झाल्याचे लक्षात येते.

४) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ४) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत रेंदाळमध्ये पाणीपुरवठा योजनेची जी उपांगे निर्माण झाली त्याची माहिती गावातील सर्व लोकांना आहे. उपांगांची सर्व नावे सांगता आली नसली तरी योजनेची माहिती सर्वांना आहे. १००% लोकांनी उपांगे माहित असल्याचे सांगितले आहे. यावरुन योजनेच्या कामाबाबत लोक जागृत आहेत. या कामामध्ये लोकसहभाग आहे. लोकांच्या सहभागातून सर्व कामे पूर्ण झाल्यामुळे विकासाला चालना मिळाल्याचे लक्षात येते.

५) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ५) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जिल्हा परिषदेमध्ये प्रकल्पासाठी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थ ओळखतात. ५७.५% लोकांनी अभियंता, गटप्रमुख, भूजलतज्ज्ञ, सामाजिक तज्ज्ञ, स्त्री पुरुष समानता तज्ज्ञ यांना ओळखत असल्याचे सांगितले. ४६ पैकी २१ महिलांनी जिल्हा परिषदेमधील महिला सक्षमीकरणाचे काम करणाया

अधिकाऱ्यांना ओळखत असल्याचे सांगितले. यावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पापूर्वी विकासासाठी गावस्तरावर राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये ग्रामस्थांच्या सहभागाला स्थान नव्हते. अधिकारी व ग्रामस्थ यांची ओळख नव्हती. जलस्वराज्य प्रकल्पामध्ये ग्रामस्थ प्रकल्पातील अधिकाऱ्यांना ओळखतात. त्यातून कामाची गुणवत्ता राखली जाते. विकासाला चालना मिळते.

६) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ६) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, अधिकारी वर्ग गावात आल्यानंतर लोकांशी संवाद साधतात. २९ लोकांनी प्रकल्पासंदर्भात जनजागृती करणे, कामाची माहिती देणे, दप्तर पाहणे या कामासाठी अधिकारी गावात येत असल्याचे सांगितले. महिला सक्षमीकरणाची माहिती देणे, बचतगट, आरोग्य, स्वच्छता, उद्योग व्यवसाय या विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी अधिकारी येत असल्याचे ३३ लोकांनी सांगितले. पाणीपुरवठा योजनेतील सुविधांचे काम पाहण्यासाठी अधिकारी येत होते. १००% लोकांना अधिकारी गावात कशासाठी येतात हे माहित आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली लोकांनी प्रकल्पाचे काम केले आहे.

७) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ७) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, पाण्याचे महत्व लोकांना समजले आहे. ग्रामसभेत वैयक्तिक नळ कनेक्शनला मिटर बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ९६.२५% लोकांनी पाण्याचे योग्य नियोजन व व्यवस्थापन यासाठी नळांना तोट्या बसविल्याचे व मिटर पद्धतीचा अवलंब केल्याचे सांगितले. रेंदाळमध्ये पूर्वी पाण्याची टंचाई मोठ्या प्रमाणात होती त्यामुळे जलस्वराज्य प्रकल्पातून मिळणारे पाणी काटकसरीने वापरण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला असल्याचे लक्षात येते. पाण्याचे महत्व व देखभाल दुरुस्ती याबाबत ग्रामस्थ जागृत असल्याचे लक्षात येते. २२,६०० लोकसंख्या असलेल्या गावाने मिटर पद्धती अवलंब केला आहे यावरुन विकासाची प्रक्रिया जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावात रुजली असल्याचे लक्षात येते.

८) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ८) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, नियमित पाणीपट्टी भरणाऱ्या लोकांचे प्रमाण ९०% आहे. योजना शाश्वत व दिर्घकाळ चालण्यासाठी पाणीपट्टी भरणे आवश्यक आहे हे लोकांना समजले आहे. जलस्वराज्य प्रकल्पातून नळपाणीपुरवठा योजना सुरु झाल्यानंतर गेल्या ५ वर्षातील थकबाकी वसूल झाली आहे. लोक स्वत:हून पाणीपट्टी जमा करु लागले आहेत. यावरुन विकासासाठी योजना राबविताना व त्या जास्तीत जास्त काळ टिकवताना लोकांचा

सहभाग आवश्यक असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले आहे. देखभाल दुरुस्तीच्या खर्चासाठी पाणीपट्टी भरण्याचे महत्व लोकांना समजले आहे.

९) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ९) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पामुळे गावाचा विकास झाला आहे असे ग्रामस्थांचे मत आहे. ८० उत्तरदात्यांच्या उत्तरामध्ये वैविध्य असले तरी त्यांनी दिलेल्या उत्तरावरुन प्रकल्पामुळे वैयक्तिक व सार्वजनिक विकास झाला असल्याचे लक्षात येते. पिण्याच्या पाण्याची सोय झाली, गाव निर्मल झाले, महिलांचे सक्षमीकरण झाले, लोकसहभाग वाढला, सामाजिक दर्जा वाढला, प्रसिध्दि मिळाली या उत्तरावरुन जलस्वराज्य प्रकल्पामुळे रेंदाळचा सर्वांगिण विकास झाला असे ग्रामस्थांचे मत असल्याचे समजते.

१०)प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - १०) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, प्रकल्पाच्या कामकाजाबाबत रेंदाळमधील ग्रामस्थ जागृत होते. अधिकारी, पदाधिकारी यांच्याकडून अल्प प्रमाणात टीका झाली. १८ ग्रामस्थांनी कामकाजावर गावातील लोकांकडून टीका झाल्याचे सांगितले. ठेकेदार, तांत्रिक सेवा पुरवठादार यांच्या कामावर ग्रामस्थांचे लक्ष असल्याचे यावरुन दिसून येते. कामात गुणवत्ता राहण्यासाठी गावातील प्रकल्प कार्यालय किंवा जलस्वराज्य प्रकल्प कार्यालय, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांचेकडे तक्रार करण्यात आली होती. अधिकाऱ्यांनी भेट देवून त्या तक्रारींचे निवारण करुन प्रकल्पाचे काम पूर्ण केले. यावरुन ग्रामस्थांमध्ये असणारी जागृती व कामाच्या गुणवत्तेबाबत असणारी ठाम भूमिका दिसून येते.

११)प्रकरण ४ मधील सारणी क्र. (ब - ११) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, स्वच्छतेच्या बाबतीत रेंदाळचा विकास घडून आला आहे. प्रकल्पापूर्वी १५ लोकांच्या घरी वैयक्तिक शौचालये होती. प्रकल्पानंतरची स्थिती पाहिली असता ८० पैकी ६० लोकांनी आपल्या घरी शौचालये बांधली. ५ लोकांच्या घरी जागेच्या कमतरतेमुळे शौचालयाची सुविधा नाही परंतु ते वैयक्तिक शौचालयाचा वापर करतात. यावरुन असे लक्षात येते की, वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छता राखणे हे प्रकल्पाचे एक प्रमुख उद्दीष्ट आहे. विकासाचा हा संदेश रेंदाळमधील सर्व ग्रामस्थांपर्यत पोहचला आहे. त्यातूनच रेंदाळ गाव निर्मल झाले आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## क) महिला सक्षमीकरणासंदर्भातील प्रश्नांचे विश्लेषण :

१) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - १) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, जलस्वराज्य प्रकल्पातंर्गत महिलांचा सहभाग वाढण्यासाठी महिला ग्रामसभेचे आयोजन करण्याचा नियम आहे. ४० महिलांपैकी ३३ महिलांनी ग्रामसभेला उपस्थित राहत असल्याचे सांगितले आहे. याचा अर्थ ८२.५% महिला ग्रामसभेला उपस्थित राहून जलस्वराज्य प्रकल्पाच्या कामकाजाबाबत चर्चा करत होत्या. निर्णय प्रक्रियेत सहभागी होत होत्या. महिला सक्षमीकरण हे जलस्वराज्य प्रकल्पाचे एक प्रमुख उद्दीष्ट आहे. ग्रामसभेच्या माध्यमातून महिलांनी विकासाच्या प्रक्रियेत आपला सहभाग नोंदविला आहे. गावाच्या विकासाचे निर्णय घेतले आहेत. महिलांना मोठ्या संख्येने ग्रामसभेत उपस्थित राहण्याची संधी जलस्वराज्य प्रकल्पामुळे मिळाल्याचे दिसून येते.

२) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - २) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ४० पैकी ३५ महिला बचतगटात सहभागी झालेल्या आहेत. महिला सक्षमीकरणाबाबत बोलले जात असताना बचतगटांचा संदर्भ येतोच. बचतगट हे महिला सक्षमीकरणाचे एक प्रभावी माध्यम आहे. बचतगटांमुळे महिलांचे संघटन कौशल्य वाढले आहे. महिलांना बचतगटाच्या माध्यमातून एकत्र आणून त्यांचा वैयक्तिक व आर्थिक विकास घडवून आणणे जलस्वराज्य प्रकल्पात अपेक्षित आहे. ७०% महिला गावात जलस्वराज्य प्रकल्प सुरु झाल्यानंतर बचतगटात सहभागी झाल्या आहेत. यावरुन जलस्वराज्य प्रकल्पामुळे रेंदाळमध्ये महिलांच्या विकासाला वाव मिळाला आहे व महिला सक्षमीकरण झाले आहे असे दिसून येते.

३) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - ३) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, महिला सक्षमीकरणांतर्गत उद्योग व्यवसायांच्या उभारणीसाठी देण्यात येणारे कर्ज ५५% महिलांनी घेतले आहे. बिजभांडवल वितरणाचा मुख्य उद्देश गरीब, गरजू महिलांना अल्प व्याजदरात कर्ज उपलब्ध व्हावे हा आहे. महिलांना व्यवसाय प्रशिक्षण मिळाल्यानंतर त्यांनी महिला विकास समितीकडे कर्ज उपलब्ध होण्यासाठी अर्ज केला होता. त्यातून गरीब महिलांची कर्जासाठी निवड करण्यात आली. यावरुन प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक सुबत्ता प्राप्त व्हावी यासाठी प्रयत्न केले असल्याचे लक्षात येते.

४) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - ४) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ५३.७५% लोकांनी व्यवसायाच्या उभारणीसाठी जलस्वराज्य प्रकल्पाव्यतिरिक्त इतर बँकांचे कर्ज घेतलेले आहे. रेंदाळमधील बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय हातमाग हा आहे. त्यामुळे त्यांना व्यवसायाचा विस्तार वाढविण्यासाठी कर्जाची गरज असल्याचे लक्षात येते.

५) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - ५) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ज्या २२ महिलांना बिजभांडवल वितरीत केले आहे त्यांनी व्यवसाय सुरु केला आहे. व्यवसायाचे स्वरुप वेगवेगळे आहे. चांदीकाम हा रेंदाळमधील महिलांचा मुख्य व्यवसाय आहे. त्याव्यतिरिक्त शिवणकाम, दुग्धव्यवसाय, किराणा दुकान, रेक्झीन बॅग तयार करणे यासारखे व्यवसाय मलिांनी सुरु केले आहेत. महिलांना उत्पन्नाचे साधन जलस्वराज्य प्रकल्पामुळे मिळाल्याचे व त्यांचे आर्थिक सक्षमीकरण झाल्याचे यावरुन दिसून येते.

६) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - ६) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, ज्या महिलांनी स्वत:चा व्यवसाय सुरु केला आहे त्यांना त्यातून फायदा होतो किंवा नाही हे पाहण्यासाठी हा प्रश्न विचारण्यात आला होता. सर्वच्या सर्व महिलांनी होय असे उत्तर दिले आहे. यावरुन महिलांची आर्थिक प्रगती झाल्याचे तसेच त्यांचे सामाजिक स्थान उंचावल्याचे लक्षात येते.

७) प्रकरण ४ मधील सारणी क्र. (क - ७) मधील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, रेंदाळमध्ये महिला सक्षमीकरणाचे चांगल्या पद्धतीचे काम झाले आहे. ८० उत्तरदात्यांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. ६२.५% उत्तरदात्यांनी महिलांना व्यवसाय मिळाला, नेतृत्व विकासास वाव मिळाला, महिलांना आवश्यक असणाया विषयांवर मार्गदर्शन मिळाले असे उत्तर दिले आहे. २५% लोकांनी महिलांना जलस्वराज्य प्रकल्पामुळे प्रथमच गावविकासात सहभागी होता आल्याचे सांगितले. १२.५% लोकांनी जलस्वराज्य प्रकल्पामुळे महिलांचे धाडस वाढले, त्यांचा सामाजिक दर्जा उंचावला असल्याचे सांगितले. याचा अर्थ गावातील सर्व लोकांना जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण झाले आहे असे वाटते.

## ५.४ एकत्रित विश्लेषण :

रेंदाळमधील जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास करत असताना विकास, लोकसहभाग व महिला सक्षमीकरण हे अभ्यासाचे प्रमुख्र तीन विषय ठरविले. हे घटक डोळयासमोर ठेवून प्रश्नावली तयार करण्यात आली. या प्रश्नावलीचे वर्गीकरण व सविस्तर विश्लेषण केल्यानंतर लक्षात येते की, रेंदाळमध्ये प्रकल्पाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लोकसहभाग विशेषत: महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात असल्यामुळे पाणीपुरवठा योजना, स्वच्छता व महिला सक्षमीकरणास मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. शासनाने ठरवून दिलेल्या नियम व निकषांप्रमाणे प्रकल्पाची यशस्वीपणे अमंलबजावणी करता आली.

## ५.५ समारोप :

जलस्वराज्य प्रकल्पातून विकास: रेंदाळ गावचा विशेष अभ्यास या लघुप्रबंधाचा अभ्यास करण्यासाठी रेंदाळमधील ग्रामस्थांची मते महत्वाची ठरली. प्रश्नावलीच्या माध्यमातून उत्तरदात्यांनी दिलेल्या उत्तरांचे आशय विश्लेषण या प्रकरणात केले आहे. प्रश्नावली हे एक तथ्य संकलनाचे माध्यम होते. त्याद्वारे ग्रामस्थांकडून रेंदाळमधील जलस्वराज्य प्रकल्पाबद्दल जास्तीत जास्त माहिती मिळविणे शक्य झाले. या अभ्यासावरुन आलेले निष्कर्ष सहाव्या प्रकरणामध्ये मांडण्यात आलेले आहेत.

# संदर्भसूची


१. ४० पुरुष व ४० महिला उत्तरदात्यांकडून भरण्यात आलेली प्रश्नावली, दि. २६/०२/०९ व दि. ०५/०३/०९

२. पाटील शिवाजी , पाणीपुरवठा व स्वच्छता समिती अध्यक्ष, ग्रा.पं. रेंदाळ यांचेशी चर्चा, दि. २६/०२/०९

३. Monthly Progress Report, Jalswarajya Project, Zilla Prishad,
Kolhapur, Dec.2008 To. March 2009

४. महिला बचतगटांशी चर्चा, ग्रा.पं. रेंदाळ, दि. ३१/०४/०९

५. रेंदाळ गावची प्रत्यक्ष पाहणी दि. ११/०९/०८ व ३१/०४/०९